# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहरातील सार्वजनिक विहिरीवरील म.न.पा.च्या वॉटर पंपांची
**{विद्युत विभाग}** वार्षिक देखभाल व दुरुस्तीच्या कामाचे प्राकलन तयार करण्यात आले असून प्राकलनिय राशी रू. 50,00,000/- इतकी आहे. या कामास प्रशासकीय मान्यता मिळण्यास्तव तसेच 8 दिवसांची लघु निविदा बोलावून हे काम करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:- 1) सदर कामाचा खर्च पद क्र. A23801730812 (जुने पद क्र. 396) अंतर्गत करावयाचा आहे.
2) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 364/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 17/ 05/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरातील सार्वजनिक विहिरीवरील म.न.पा.च्या वॉटर पंपांची वार्षिक देखभाल व दुरुस्तीच्या कामाचे प्राकलन तयार करण्यात आले असून प्राकलनिय राशी रू. 50,00,000/- इतकी आहे. या कामास प्रशासकीय मान्यता मिळण्यास्तव तसेच 8 दिवसांची लघु निविदा बोलावून हे काम करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**